# आदेश निशाणी क्र.१८ वर

(सी एन आर क्र- एमएचबीयु१३०००१८२०१६)

प्रस्तूतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ नुसार वादपत्र दुरुस्तीसाठी केलेला आहे.

०२. वादी सांगतात, प्रस्तुतचा दावा जमीनीच्या हद्दी खुणा कायम होवून अतिक्रमीत जमीनीचा ताबा मिळण्याकरीता दावा केला आहे. ते पुढे सांगतात, प्रतिवादी यांनी १० आर या जमीनीवर अतिक्रमण केल्याचे अनुषंगाने दावा केला होता. न्यायालयाचे समोर वस्तूस्थिती येण्यासाठी वादींनी न्यायालयात कोर्ट कमीश्नर यांचे नेमणुकीसाठी अर्ज केला होता. तो अर्ज मंजुर झाला त्याप्रमाणे मोजणी अधिकारी यांनी दिनांक १५/१०/२०१६ रोजी मो.र.क्र. ३९ नुसार मोजणी केली असता त्यामध्ये १७ आर जमीन ही प्रतिवादी क्र.०३ यांचेकडे निघालेली आहे. त्यामुळे वादींनी त्या अनुषंगाने दुरुस्ती करणे गरजेचे झाले आहे. म्हणुन हा अर्ज.

०३. पुरेसा अवधी देवूनही यातील प्रतिवादींनी या अर्जास म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द म्हणणे नाही हा आदेश पारित केलेला आहे.

०४. वादी यांचे विधीज्ञांचे युक्तीवाद ऐकला. पुरेसा अवधी देवूनही प्रतिवादी यांचेमार्फत युक्तीवाद करण्यात आला नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द तसा युक्तीवाद नाहीचा आदेश पारित केलेला आहे.

०५. प्रस्तुतचा दावा जमीनीच्या हद्दी खुणा कायम होवून मिळणेसाठी, अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा व दरम्यानचे उत्पन्नासाठीचा आहे. वादींना प्रस्तुत दरुस्ती अर्जाव्दारे मोजणीचे अनुषंगाने घडामोडी नमुद करणेचे आहे. प्रस्तावित दुरुस्तीव्दारे वादींना दाव्याचे शिर्षकामध्ये तसेच वादपत्रातील पान क्र ४ व ५ या कथनांमध्ये अंक स्वरुपाची प्रस्तावित दुरुस्ती तसेच ५ अ म्हणून मोजणीचे अनुषंगाने घडामोडी तसेच कलम ७ मध्ये तारीख व विनंती कमलमामध्ये अंक स्वरुपाची दुरुस्ती करणेची आहे.

०६. प्रस्तावित दुरुस्ती पाहता, ती वादमिळकतीचे अनुषंगाने आहे तसेच प्रकरणामध्ये न्यायालयामार्फत न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक झाली व त्यांचेमार्फत

मोजणी झाली या झालेल्या मोजणीच्या घडामोडीबद्दल दुरुस्ती आहे. त्यातील काही दुरुस्ती ही अंक स्वरुपाची आहे. महत्वाची बाब ही आहे की, दुरुस्तीस प्रतिवादींनी म्हणण्याव्दारे अगर इतर प्रकारे नकार दर्शविलेला नाही.

०७. वादींनी दुरुस्तीव्दारे मजकूर नमुद केला म्हणजे तो आहे असाच स्विकारला जाईल असेही नाही. प्रस्तावित दुरुस्तीची सत्यता व सिध्दता या स्थितीत पाहता येणार नाही. वादींनी केलेल्या कथनांची शाबीती तसेच त्यांनी केलेली मागणी मंजुर करता येते किंवा कसे या गोष्टी चौकशीअंती पुरावा घेवूनच ठरणार आहेत.

०८. या प्रकरणात अद्याप मुद्दे तयार करण्यात आलेले नाही. त्यामुळे प्रकरण चौकशीस नाही. प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप व मुळ दाव्याचे स्वरुप पाहता अंतीम निर्णयाप्रत पोहोचण्यासाठी ती मंजुर करणे उचित वाटते. तसे न झाल्यास दाव्याचे कामी तांत्रीक दोष निर्माण होतील तसेच वादी दुरुस्तीव्दारे जी कथने नमुद करु इच्छीतात ती अभिलेखावर येणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती करण्याने दाव्याचे तांत्रीक दोष टाळता येतील तसेच वादमिळकतीचे अनुषंगाने भविष्यात बहूविध प्रकरणे निर्माण होतील ही शक्यता टाळता येईल.

०९. सबब वरिल सर्व चर्चेचा विचार करता, दाव्याचे स्वरुपाचा विचार करता अंतीम न्यायाच्या दृष्टीने तसेच प्रकरणामध्ये योग्य त–हेने निर्णय होणेकामी मदत होणेसाठी प्रस्तावित दुरुस्ती मंजूर करणे न्यायोचित होईल. म्हणून वादींचा अर्ज निशाणी क्रमांक १८ हा रुपये १००/–(रुपये शंभर मात्र) च्या खर्चावर मंजूर केला. खर्चाची रक्कम विधी सेवा केंद्रात जमा करावी. वादींनी दुरुस्ती व दुरुस्त प्रतिची पुर्तता पुढील तारखेस करावी.

स्थळः चिखली. (कु.एल.एच.जाधव)
दिनांकः ०२/०७/२०१९ सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
चिखली.